TRANSLATION IN INDIA
...The Best You Can Get.

A Division of Jnt Infotech Pvt Ltd .....

NOTARY * GOVERNMENT OF INDIA *
ASLAM A. B. SHAIKH
NOTARY
GOVT. OF INDIA
PUNE
REG. NO. 3448
EXP. DT.
31/05/2026

GOVERNMENT OF MAHARASHTRA
SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT
Mantralaya (Extension), Chamber No. 432,
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai - 32.

Tel. No. :- Email ID : - sm2.sesd-mh@gov.in

---

No. SFS - 1021 / C. No. 173 / SM - 2 Date:- 21 January, 2022

**LETTER OF APPROVAL** TRANSLATED COPY

To,
Chairman / Secretary,
Late Wamanraoji Kadam Bordikar Service Institute, Jintur, Dist. Parbhani 431509.

Sub - Letter of approval for starting new school or on self financed basis or up-gradation of existing school under Maharashtra Self Financed School (Establishment & Regulation) Act, 2012.....

Late Wamanraoji Kadam Bordikar Service Institute, Jintur, Dist. Parbhani operated Bordikar Podar Learn School, Group No. 42 / 7, Mathla, Tal. Jintur, Dist. Parbhani.

Ref - Letter of Intent No. SFS - 1021 / C. No. 173 / SM - 2, Dated 12.07.2021.

Under Maharashtra Self Finance School (Establishment & Regulation) Act, 2012 the Institute Late Wamanraoji Kadam Bordikar Service Institute, Jintur, Dist. Parbhani had submitted an application to start a new school from the academic year 2021 - 22 on self financed basis namely Bordikar Podar Learn School, Group No. 42 / 7, Mathla, Tal. Jintur, Dist. Parbhani (Primary to Higher Secondary, Standard 1 to 12, all streams, English medium, CBSE).

2. With reference to your application, under Maharashtra Self Financed School (Establishment & Regulation) Act, 2012 and Maharashtra Self Financed School (Establishment & Regulation) Rules, 2020 from the academic year 2021 - 22 Late Wamanraoji Kadam Bordikar Service Institute, Jintur, Dist. Parbhani operated Bordikar Podar Learn School, Group No. 42 / 7, Mathla, Tal. Jintur, Dist. Parbhani (Primary to Higher Secondary, Standard 1 to 12, all streams, English medium, CBSE) Letter of Intent along with terms and conditions had been issued to start the construction of the school on self financed basis. Now the Approval to start the said school is being granted subject to following terms and conditions : -

TRANSLATION IN INDIA TVI PUNE-13

*We confirm that this is a accurate translation of the original document provided*
*http://www.translatorscafe.com/cafe/SelectedAgency.asp?Agency=8209*
*Office No-I-58, Parmar Nagar, Phase-III, FatimaNagar, Pune-411013, Tel: 8446000081 / 83*
*Cell: 09767851881, 9225636523. Email: info@translationinindia.com*
*Visit us at: www.translationinindia.com*

CERTIFIED TRANSLATION * TC AGENCY CODE 8209 * TRANSLATION IN INDIA

3. Terms & Conditions : -

1) Proposed school will fulfill all the standards, terms and conditions set by Right of child to free and compulsory education Act, 2009 and Maharashtra Right of Children to Free and Compulsory Education Rule, 2011 and directions given by the Government as per this Act or standards or authenticators or terms and conditions specified by the Government from time to time.
2) It is mandatory for the Registered Institute or Trust or Company to comply with all the standards, terms and conditions set by Maharashtra Self Financed School (Establishment & Regulation) Act, 2012 and the directions given by the Government as per this Act or the standards, or terms and conditions specified from time to time by the Government.
3) For the school managements desirous for affiliation with C.B.S.E or C.I.S.C.E. or C.A.I.E or I.B. etc. boards it is mandatory to obtain No-Objection Certificate from the Government as per the directions given by the Government from time to time.
4) School management will inform the Education Officer of the concerned district before starting the academic year approved by the Government.
5) As per the provisions of this Act the permission granted for establishment of new school or up-gradation of the school, will only be for that academic year for which it has been approved.
6) If the school management fails to start the school within 18 months, the Letter of Approval given will be cancelled.
7) School management cannot change the medium of education, place of school which has been approved, in future without the permission of the Government.
8) If the school management has established the school at the place apart from which has been approved by the Government, then the permission of that school will be cancelled.
9) Such provision has been made that, recruitment of teachers and non-teacher employees in the self financed school should be done as per prevalent rules and regulations of the Government.
10) At the time of filling district wise information, the school for which permission has been granted, will fill up the information as "self financed school" and will obtain U.D.I.S.E. No. In this regard, State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai has been declared as the Nodal Officer.
11) School management will put up a board as "self financed permission granted school" on the entrances of the school premises.
12) For the reason of violating any provision under this Act or rules made there under or defaulting in compliance with any directions issued as per the Act or standards or authenticators or terms and conditions specified by the Government from time to time, State Government at any time may revoke the given Letter of Approval.

TRANSLATED COPY

***We confirm that this is a accurate translation of the original document provided***
*http://www.translatorscafe.com/cafe/SelectedAgency.asp?Agency=8209*
*Office No-I-58, Parmar Nagar, Phase-III, FatimaNagar, Pune-411013, Tel: 8446000081 / 83 / 85,*
*Cell: 09767851881, 9225636523. Email: info@translationinindia.com*
***Visit us at:*** *www.translationinindia.com*

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:- Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.१७३/एसएम-२ दिनांक:- २१ जानेवारी, २०२२

## मान्यता पत्र

प्रति,
**अध्यक्ष / सचिव,**
**कै.वामनरावजी कदम बोर्डीकर सेवा संस्था, जिंतुर, जि.परभणी ४३१५०९.**

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

**कै.वामनरावजी कदम बोर्डीकर सेवा संस्था, जिंतुर, जि.परभणी संचलित बोर्डीकर पोदार लर्न स्कुल, गट क्र.४२/७, माथला, ता.जिंतुर, जि.परभणी.**

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.१७३/एसएम-२, दिनांक १२.०७.२०२१.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **कै.वामनरावजी कदम बोर्डीकर सेवा संस्था, जिंतुर, जि.परभणी** या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून **बोर्डीकर पोदार लर्न स्कुल, गट क्र.४२/७, माथला, ता.जिंतुर, जि.परभणी (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम,सीबीएसई)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून **कै.वामनरावजी कदम बोर्डीकर सेवा संस्था, जिंतुर, जि.परभणी** संचलित **बोर्डीकर पोदार लर्न स्कुल, गट क्र.४२/७, माथला, ता.जिंतुर, जि.परभणी (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम,सीबीएसई)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटीं व शर्तींसह इरादा पत्र दिले होते. आता सदर शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तींस अधीन राहून देण्यात येत आहे:-

**३. अटी व शर्ती :-**

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(इ.मु. काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद.मुंबई ,
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी.
७. निवड नस्ती एस एम २ (१७३/२१).